MHNG170006962025

दाखल तारीख :– १३.०८.२०२५
नोंदणी तारीख :– १३.०८.२०२५
निकाल तारीख :– ०७.०५.२०२६
कालावधी :– वर्ष, महीने, दिवस
००, ०८, २५.

**<u>विद्यमान न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, भिवापूर, तह. भिवापूर, जि. नागपूर</u>**

**<u>(पिठासीन अधिकारी श्री. एस.जे. लाड)</u>**

**नियमित फौजदारी खटला क्र.८६/२०२५** **निशाणी क्र.३४.**

**<u>प्रथम खबर मधील तपशिल :–</u>**

**अपराध क्रमांक** : १९३/२०२५, दिनांक ०५.०४.२०२५

**पोलीस स्टेशन** : भिवापूर, ता. भिवापूर, जि. नागपूर

| | |
|---|---|
| **अभियोग पक्ष –** | महाराष्ट्र सरकारतर्फे पोलीस स्टेशन अधिकारी, पोलीस स्टेशन भिवापूर, ता. भिवापूर, जि. नागपूर |
| **अभियोग पक्षातर्फे विधीज्ञ –** | श्री एस. एस. मोरे |
| **आरोपी –** | **१. अभय शिवराम गोंडाणे,**<br>वय २६ वर्षे, व्यवसाय– –,<br>रा. काळापाटा, ता.पारशिवणी, जि.नागपूर.<br><br>**२. सचिन चंद्रशेखर वाघमारे,**<br>वय ३६ वर्षे, व्यवसाय– –,<br>रा. बांते लेआऊट हुडकेश्वर, नागपूर. |
| **आरोपींतर्फे विधिज्ञ –** | श्री पी.एस. हुंगे |

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेली तारीख | ०५.०४.२०२५ |
| गुन्हा दाखल तारीख | ०५.०४.२०२५ |

| | |
|---|---|
| दोषारोपपत्र दाखल तारीख | १३.०८.२०२५ |
| दोषारोप निश्चीत केल्याची तारीख | ११.११.२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | २७.०१.२०२६ |
| न्यायनिर्णयाकरिता राखीव ठेवलेली तारीख | ०७.०५.२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०७.०५.२०२६ |
| शिक्षेची तारीख, जर दिली असेल तर | ---- |

## आरोपीचे विवरण

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>आरोपीचे नाव</th><th>अटक तारीख</th><th>जामीनावर सोडल्याची तारीख</th><th>दोषारोप</th><th>शिक्षा अथवा निर्दोष मुक्त</th><th>शिक्षेबाबत विवरण</th><th>उपभोगलेली शिक्षा</th></tr>
<tr><td>१.</td><td>अभय शिवराम गोंडाणे</td><td>०५.०४.२०२५</td><td>०६.०४.२०२५</td><td rowspan="2">३०३(२), ४९ भा.न्या.सं. व सार्वजनिक संपत्ती हानी प्रतिबंधक अधिनियमचे कलम ३</td><td rowspan="2">आरोपींना निर्दोष मुक्त</td><td rowspan="2">–</td><td rowspan="2">–</td></tr>
<tr><td>२.</td><td>सचिन चंद्रशेखर वाघमारे</td><td>०५.०४.२०२५</td><td>११.११.२०२५</td></tr>
</table>

## तपासलेले साक्षीदार

अ. अभियोग पक्षातर्फे :-

| अ.क्र. | साक्षीदारांचे नाव | पुराव्यातील स्थान | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| सा.क्र.१ | देविदास दशरथ कुरुडकर | घटनास्थळ पंच | १८ |
| सा.क्र.२ | नितेश दशरथ भोगे | घटनास्थळ पंच | २१ |
| सा.क्र.३ | भगवानदास सुरजलाल यादव | तपास अधिकारी | २३ |

| | | | |
|---|---|---|---|
| सा.क्र.४ | वासुदेव परसराम समर्थ | फिर्यादी | २९ |

ब. बचाव पक्षातर्फे :– नाही.

क. न्यायालयातर्फे :– नाही.

## निशाणी क्रमांकाची यादी

अ. अभियोग पक्षातर्फे **:–**

| **अ.क्र.** | **निशाणी** | **पुराव्याचे स्थान** |
|---|---|---|
| १. | नि.क्र.१९ | समन्स |
| २. | नि.क्र.२० | घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा |
| ३. | नि.क्र.२४ | तहसीलदारांना दिलेले पत्र |
| ४. | नि.क्र.२५ | सार्वजनिक बांधकम विभागाला दिलेले पत्र |
| ५. | नि.क्र.२६ व २७ | प्रादेशीक परिवहन यांना दिलेले पत्र |
| ६. | नि.क्र.३० | फिर्याद |
| ७. | नि.क्र.३१ | छापील प्रथम खबर अहवाल |
| ८. | आर्टिकल अ | अहवाल |

ब. बचाव पक्षातर्फे :– नाही.

क. न्यायालयातर्फे :– नाही.

## ड. मुद्देमाल

| **अ.क्र.** | **मुद्देमाल क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | – | टिप्पर क्र.एम.एच.३५–ए.जे.३१०६ हा ७ ब्रास रेतीसह |

## न्या य नि र्ण य

## (दिनांक ७ मे, २०२६ रोजी पारीत)

आरोपींविरुध्द भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३०३(२), ४९ व सार्वजनिक संपत्ती हानी प्रतिबंधक अधिनियमचे कलम ३ अंतर्गत शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्याकरिता संपरीक्षा चालविण्यात आली.

**अभियोग पक्षाची संक्षिप्त हकीकत :–**

२. घटनेची थोडक्यात हकीकत अशी की, फिर्यादी वासुदेव समर्थ हे पोलीस स्टेशन भिवापूर येथे पोलीस शिपाई म्हणून कार्यरत होते. ते ठाणेदार निर्मल यांच्या आदेशान्वये दि.०५.०४.२०२५ चे ११.४७ वा. स्टे.डा. सान्हा क्र.२०/२०२५ अन्वये पोलीस स्टेशन मधील कारगाव बिटमध्ये पेट्रोलींग करिता रवाना होवून कारगाव बिट पेट्रोलींग करीत असताना टिप्पर क्र.एम.एच.३५–ए.जे.३१०६ कारगाव शिवारात करांडला अल झम झम रिसोर्टकडे जाणाऱ्या रस्त्याने जाताना दिसला सदर वाहन चालकास वाहन थांबविण्याचा इशारा केला असता वाहन चालकाने टिप्पर थांबविले असता त्यास त्याचे नाव विचारले असता त्याने अभय गोंडाने असे सांगितले. सदर टिप्परची पाहणी केली असता टिप्परमध्ये रेती भरुन असल्याचे दिसल्याने टिप्पर चालकास रेतीच्या परवान्याबाबत विचारणा केली असता त्याने रॉयल्टी नसल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांनी दोन पंचांना समन्स दिले व पंचांना कारगाव शिवार करांडला अल झम झम रिसोर्टकडे जाणाऱ्या रस्ता येथे हजर झाल्याने पंचांसमक्ष टिप्परमध्ये असलेले रेतीच्या वाहतुकीबाबत परवाना विचारपुस केली असता त्याने परवाना सादर केले नाही. तसेच सदर टिप्परमध्ये मालक सचिन चंद्रशेखर वाघमारे याचे सांगणेवरुन शिवनाळा घाट येथून भरुन आणले व नागपूर येथे घेवून जात असल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांनी टिप्पर व सात ब्रास रेती जप्त करुन घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा तयार करुन पोलीस स्टेशनला जावून फिर्याद दिली.

३. फिर्यादीचे उपरोक्त आशयाच्या बयानावरुन, आरोपींविरुध्द अपराध क्र.१९३/२०२५ भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३०३(२), ४९ महाराष्ट्र

जमीन महसूल संहिता कलम ४८(७), ४८(८), खान आणि खनिज (नियमन आणि विकास) अधिनियम, १९५७ चे कलम ४ व २१ व सार्वजनिक मालमत्ता नुकसान कायदा १९८४ चे कलम ३ व पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ चे कलम १५ कायद्यान्वये पोलीस स्टेशन, भिवापूर येथे गुन्ह्याची नोंद केली. सहाय्यक फौजदार भगवानदास यादव यांच्याकडे तपास सोपविला. त्यांनी तपासादरम्यान तहसीलदार, सार्वजनिक बांधकाम विभाग व प्रादेशीक परिवहन यांना पत्र दिले, साक्षीदारांचे बयान नोंदवून तपासाअंती आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

४. चौकशी दरम्यान दोषारोप पत्राचे अवलोकनकरिता असे निदर्शनास आले की, भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३०३(२), ४९ महाराष्ट्र जमीन महसूल संहिता कलम ४८(७), ४८(८), खान आणि खनिज (नियमन आणि विकास) अधिनियम, १९५७ चे कलम ४ व २१ व सार्वजनिक मालमत्ता नुकसान कायदा १९८४ चे कलम ३ व पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ चे कलम १५ प्रमाणे आरोपींविरुद्ध दोषारोप पत्र दाखल करण्यात आले, परंतु, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता कलम ४८(७), ४८(८), खान आणि खनिज (नियमन आणि विकास) अधिनियम, १९५७ चे कलम ४ व २१ या कायद्यान्वये त्या कायद्यांतर्गत अर्विभूत अधिकाऱ्याने तक्रार देणे आवश्यक असते व त्यानुसार न्यायालयाला खटल्याची दखल घेता येते, परंतु, सदरची फिर्याद ही पोलीस अधिकाऱ्याने दिली असल्यामुळे मी नि.क्र.१ वर आदेश करुन महाराष्ट्र जमीन महसूल संहिता कलम ४८(७), ४८(८), खान आणि खनिज (नियमन आणि विकास) अधिनियम, १९५७ चे कलम ४ व २१ गुन्ह्यांची दखल घेता येत नसल्यामुळे त्याकरिता आदेश करुन मी आरोपींविरुद्ध मी भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३०३(२), ४९ व सार्वजनिक मालमत्ता नुकसान कायदा १९८४ चे कलम ३ नुसार नि.क्र.१२ वर दोषारोप निश्चीत केला. आरोपींना त्यांच्या मातृभाषेत वाचून व समजावून सांगीतला. आरोपींची जबानी नि.क्र.१३ व १४ वर नोंदविण्यात आली. आरोपींनी गुन्हा कबुल नसल्याचे सांगून संपरीक्षा चालविण्याची विनंती केली. साक्षीदारांच्या बयानात आरोपींविरुध्द सबळ पुरावा आढळून आल्याने आरोपींचे भारतीय

नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ३५१ अंतर्गत बयान निशाणी क्रमांक ३२ व ३३ वर नोंदविण्यात आले. आरोपींनी खोटी केस असल्याचा बचाव घेतला.

**५.** अभियोग पक्षाचा खटला, आरोपीचा बचाव, विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.एस.एस.मोरे व आरोपीचे विद्वान विधीज्ञ श्री.पी.एस.हुंगे यांचे युक्तीवादावरुन खालील मुद्दे निर्धारणाकरिता उपस्थीत होतात, त्यांना मी सहकारण निष्कर्ष देत आहे.

**६.** विचारार्थ निर्माण झालेले मुद्दे :–

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने असे सिध्द केले आहे काय की, आरोपीने दिनांक ०५.०४.२०२५ रोजी १२.०० ते १२.२५ वा. दरम्यान कारगाव, ता.भिवापूर, येथे आरोपी क्र.१ याचा टिप्पर एम.एच.३५–ए.जे.३१०६ मधुन अवैधरित्या गौण खनिज सात ब्रास रेती शासनाच्या संमतीशिवाय अप्रामाणिकपणे चोरी केली व भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३०३(२) अन्वये गुन्हा केला काय ? | **नकारार्थी.** |
| २. | वरील नमुद ठिकाणी व वेळी आरोपी क्र.२ याने आरोपी क्र.१ याला गौणखनिज विना परवाना वाहतुक करण्यास परावृत्त केले व त्यान्वये भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ४९ अन्वये गुन्हा केला काय ? | **नकारार्थी.** |
| ३. | वरील नमुद ठिकाणी व वेळी आरोपींनी जाणीवपूर्वक सार्वजनिक मालमत्तेचे हानी करण्याच्या उद्देशाने गौण खनिज चोरी केली व त्यायोगे सार्वजनिक मालमत्ता नुकसान कायदा कलम ३ अन्वये गुन्हा केला काय ? | **नकारार्थी.** |
| ४. | आदेश काय? | **आरोपींना निर्दोष मुक्त** |

| | | |
|---|---|---|
| | | करण्यात आले. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ ते ३ बाबत :-**

७. अभियोग पक्षाने गुन्हा सिध्दतेकामी एकूण चार साक्षीदार तपासले. फिर्यादी वासुदेव परसराम समर्थ (सा.क्र.४) यांना नि.क्र.२९ वर तपासले. त्यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, दि.०५.०४.२०२५ रोजी ते पोलीस स्टेशन भिवापूर येथे पोलीस शिपाई म्हणून कार्यरत होते. त्यादिवशी ते ए.एस.आय. भगवानदास यादव यांच्यासह कारगाव बिट परिसरात पेट्रोलींग करीत असताना दुपारी १२.०० वा. कारगाव कऱ्हांडला कच्चा रस्त्यावर एक टिप्पर येताना दिसला. त्याला त्यांनी थांबविले त्याची तपासणी केली असता त्यामध्ये रेती आढळून आली. चालकाला परवाना बाबत विचारणा केली असता त्याच्याकडे परवाना नव्हता. त्या टिप्परचा क्र.एम.एच.३५–ए.जे.३१०६ असा होता. त्यानंतर त्यांनी दोन पंचांना समन्स दिला व त्यानंतर घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा तयार केला. त्यानंतर ते टिप्पर घेवून पोलीस स्टेशनला गेले व फिर्याद दिली. त्यांच्या पुराव्यात समन्स नि.क्र.१९, घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा नि.क्र.२०, फिर्याद नि.क्र.३० व छापील प्रथम खबर अहवाल नि.क्र.३१ वर सिद्ध करण्यात आले. बचाव पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलट तपासात त्यांनी सर्व उत्तरसूचक प्रश्नांना नाकारार्थी उत्तर दिले.

८. त्यानंतर अभियोग पक्षाने घटनास्थळ पंच देविदास दशरथ (सा.क्र.१) याला नि.क्र.१८ वर तपासले. त्याने त्याच्या पुराव्यात असे कथन केले की, दि.०५.०४.२०२५ रोजी पोलिसांनी त्याला समन्स दिला होता. पोलिसांनी त्यानंतर घटनास्थळी एक टिप्पर ज्यामध्ये रेती होती तो जप्त केला व तसा पंचनामा तयार केला. पोलिसांनी तो पंचनामा त्याला वाचून दाखविला व त्याची सही घेतली. त्यावेळी दुसरा

पंच नितेश भोगे होता. त्याने ज्या व्यक्तीकडून टिप्पर जप्त केला त्याला ओळखू शकत नाही असे कथन केले. त्याच्या पुराव्यात समन्स नि.क्र.१९, घटनास्थळ वजा जप्ती नि.क्र.२० वर सिद्ध करण्यात आले. बचाव पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलट तपासात त्याने असे मान्य केले की, तो तीन वर्षांपासून उपसरपंच पदावर आहे तसेच त्यामुळे त्याला प्रशासकीय कामात मदत करावी लागते व त्याचा पोलिसांशी संपर्क असतो. त्याने एका कागदावर सही केली होती. त्याने किती सह्या केल्या त्या त्याला आठवत नाही. त्याने पुढे असे मान्य केले की, त्याने पंचनाम्यावर सही केली होती पंचनामा वाचून पाहिला नव्हता. पंचनामा १२.३० ते १.३० वा. दरम्यान केला होता. इतर सर्व उत्तरसूचक प्रश्नांना त्याने नकारार्थी उत्तर दिले.

९. त्यानंतर अभियोग पक्षाने घटनास्थळ पंच नितेश दशरथ भोगे (सा.क्र.२) याला नि.क्र.२१ वर तपासले. त्याने त्याच्या पुराव्यात असे कथन केले की, दि.०५.०४.२०२४ रोजी पोलिसांनी त्याला समन्स दिला होता. पोलिसांनी त्यानंतर कारगाव शिवरात नेले तेथे एक टिप्पर ज्यामध्ये रेती होती तो जप्त केला व तसा पंचनामा तयार केला. त्याने असे कथन केले की, जप्त केलेल्या टिप्परचा नंबर तो सांगू शकत नाही. त्याच्या पुराव्यात समन्स नि.क्र.१९, घटनास्थळ वजा जप्ती नि.क्र.२० वर सिद्ध करण्यात आले. बचाव पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलट तपासात त्याने असे मान्य केले की, त्याने केवळ दोन सह्या केल्या होत्या. तसेच पोलिसांनी टिप्पर थांबविलेला होता तेथे त्याला समन्स दिला व पंचनामा केला. त्याने पुढे असे मान्य केले की, पोलिसांनी मोजमाप त्याच्या समक्ष केले नव्हते. तसेच पोलिसांनी त्याला पंचनाम्यावर सही करण्यास सांगितले म्हणून त्याने सह्या केल्या व पोलिसांनी पंचनाम्यात काय लिहीले आहे ते त्याला लक्षात नाही. त्याने पुढे असे मान्य केले की, त्यामुळे पंचनामा कसला होता हे तो

ठामपणे सांगू शकत नाही. त्याने पुढे असे मान्य केले की, त्याच्या समक्ष कुठलाही पंचनाम केला नाही पोलिसांनी सही करण्यास सांगितले म्हणून त्याने सही केली. इतर सर्व उत्तरसूचक प्रश्नांना नकारार्थी उत्तर दिले.

**१०.** सरतेशेवटी अभियोग पक्षाने तपास अधिकारी भगवानदास सुरजलाल यादव (सा.क्र.३) यांना नि.क्र.२३ वर तपासले. त्यांनी त्यांचे पुराव्यात असे कथन केले की, दिनांक ०५.०४.२०२५ रोजी ते पोलीस स्टेशन भिवापूर येथे सहाय्यक फौजदार म्हणून ड्युटीवर होते. त्यादिवशी गुन्हा क्रमांक १९३/२०२५ नोंद झाला होता. त्याचा तपास त्यांच्याकडे आला. त्यांच्याकडून प्राथमिक तपासाचे दस्त हस्तगत केले. पुढील तपासादरम्यान त्यांनी तहसीलदार, प्रादेशीक परीवहन व सार्वजनिक बांधकाम विभाग यांना पत्र दिले, साक्षीदारांचे बयान घेतले व तपासाअंती दोषारोपत्र दाखल केले. त्यांच्या पुराव्यात तहसीलदारांना दिलेले पत्र नि.क्र.२४, सार्वजनिक बांधकाम विभागाला दिलेले पत्र नि.क्र.२५ व प्रादेशीक परीवहन यांना दिलेले पत्र नि.क्र.२६ व २७ व वाहनाचे वजन करुन घेतले व तसा अहवाल आर्टिकल अ वर सिद्ध करण्यात आले. बचाव पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलट तपासात त्यांनी सर्व उत्तरसूचक प्रश्नांना त्यांनी नकारात्मक उत्तर दिले.

**११.** वर नमुद साक्षीदारांचे बयानांचे अवलोकनकरिता असे निर्दशनास येते की, अभियोग पक्षाने केवळ दोन स्वतंत्र साक्षीदार म्हणजे पंच साक्षीदार घटनास्थळ पंच देविदास दशरथ (सा.क्र.१) व नितेश दशरथ भोगे (सा.क्र.२) यांना तपासले. त्यांच्या पुराव्यात जप्ती पंचनामा नि.क्र.२० वर सिद्ध करण्यात आला, परंतु, सदर साक्षीदारांची उलट तपासाची काळजीपूर्वक अवलोकनकरिता असे निदर्शनास येते की, पंच साक्षीदार देविदास याने असे मान्य केले की, पंचनामा त्याने वाचून पाहिला नव्हता तसेच त्याने किती सह्या केल्या. त्यानंतर नितेश भोगे याने देखील त्याच्या उलट तपास असे मान्य केले की, पंचनाम्यात काय लिहीले आहे हे त्याला लक्षात नाही व तो कशा संदर्भात आहे

हे त्याला माहीत नाही. त्या अनुषंगाने जप्ती पंचनामा नि.क्र.२० चे अवलोकनकरिता त्यामधे घटनास्थळ हे नवेगाव देशमुख शिवार असे नमूद केले आहे. पण त्यामधे पंचनामा कोणत्या ठिकाणी केला व त्याच्या चतुःसिमा नमूद केलेल्या नाहीत. सर्वात महत्वाचे म्हणजे घटनास्थळ वजा जप्ती पंचनाम्यामधे कोणते वाहन जप्त केले व त्याूधे काय जप्त केले त्या मालमत्तेचे विवरण पंचनाम्यात नमूद केले नाही. त्यामुळे तो पंचनामा हा जरी पंच साक्षीदारांच्या पुराव्यात सिद्ध झाला तरी त्या जप्ती पंचनाम्यावर वाजवी संशय निर्माण होतो की, घटनेच्यावेळी आरोपीच्या ताब्यातून टिप्पर जप्त केला होता किंवा नाही.

१२. त्या व्यतिरिक्त सर्व साक्षीदार हे पोलीस कर्मचारी आहेत. प्रस्तुत खटल्यात तपास अधिकारी भगवान सुरजलाल यादव (सा.क्र.३) व फिर्यादी वासुदेव परसराम समर्थ (सा.क्र.४) यांनी आरोपींवरील गुन्हा सिद्ध करणेकामी केवळ फिर्याद नोंदवून घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा तयार केला. प्रस्तुत खटल्यात अभियोग पक्षाला हे सिद्ध करायचे आहे की, घटनेच्या दिवशी आरोपी हे त्यांचे टिप्परमध्ये विना परवाना रेती चोरी करुन घेऊन जात होते किंवा नाही. त्या अनुषंगाने संपूर्ण अभियोग पक्षाच्या पुराव्यात केवळ घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा यावर भिस्त आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे घटनास्थळ वजा जप्ती पंचनाम्यातील पंच साक्षीदाराने अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. तसेच, त्या साक्षीदारांव्यतिरिक्त फिर्यादी वासुदेव परसराम समर्थ (सा.क्र.४) व तपास अधिकारी भगवान सुरजलाल यादव (सा.क्र.३) यांनी इतर कोणत्याही स्वतंत्र साक्षीदारांचे किंवा प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे बयान नोंदविलेले नाहीत. त्यामुळे घटनेच्या दिवशी जप्त केलेला टिप्पर हा आरोपी क्र.१ चालवत होता व त्यामध्ये विना परवाना रेती होती हे स्वतंत्र साक्षीदारामार्फत सिद्ध झालेले नाही. तसेच सर्वात महत्वाचे म्हणजे पंचनामा करण्यात महत्वाच्या बाबी संदर्भात तृटी असल्यामुळे तो पंचनामा सिद्ध झाला असे म्हणता येणार नाही.

१३. अभियोग पक्षाच्या खटल्यानुसार आरोपी क्र.२ याने आरोपी क्र.१ याला रेती चोरी करण्याकरिता प्रेरीत केले होते व तो जप्त केलेला टिप्पर आरोपी क्र.२ याच्या

मालकीचा होता, परंतु, ही बाब सिद्ध करणेकरिता तपास अधिकारी भगवान सुरजलाल यादव (सा.क्र.३) यांनी जप्त केलेला टिप्पर आरोपीचा मालकीचा असल्याचे कोणताही कागदोपत्री पुरावा आणला नाही. त्यामुळे जप्त केलेला टिप्पर हा आरोपी क्र.२ याच्या मालकीचा आहे हे पुराव्यात कुठेही दिसून येत नाही. तसेच, त्याने आरोपी क्र.१ याला रेती चोरी करणेकरिता प्रेरीत केले या संदर्भातही घटनास्थळ वजा जप्त पंचनाम्या व्यतिरिक्त इतर कुठलाही पुरावा नाही. त्यामुळे सदर खटल्यात आरोपी क्र.२ याला सदर गुन्ह्याशी जोडण्याकरिता अभियोग पक्षाने कुठलाही पुरवा आणलेला नाही. तसेच आरोपी क्र.१ विरोधातही अभियोग पक्षाचा संपूर्ण खटला हा फिर्याद व घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा केवळ यावर अवलंबून आहे. त्यामध्येही घटनास्थळ पंचांनी अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. त्यामुळे ते देखील स्वतंत्र साक्षीदारामार्फत सिद्ध झालेले नाही. त्यामुळे वरील सर्व चर्चेअंती पुरेशा पुराव्या अभावी आरोपींविरुद्ध खटला हा संशयापलीकडे जाऊन सिद्ध होत नाही. त्यामुळे आरोपी हे निर्दोष सुटण्यास पात्र आहेत. म्हणून मी मुद्दा क्रमांक १ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

<u>मुद्दा क्र.४ बाबत</u> :–

**१४.** मुद्दा क्रमांक १ ते ३ च्या निष्कर्षावरुन असे दिसून येते की, आरोपी हे निर्दोष होण्यास पात्र आहेत. करिता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

<u>१.</u> आरोपी क्र.१ **अभय शिवराम गोंडाणे** व आरोपी क्र.२ **सचिन चंद्रशेखर वाघमारे** यांना भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३०३(२), ४९ व सार्वजनिक संपत्ती हानी प्रतिबंधक अधिनियमचे कलम ३ अन्वये शिक्षेस पात्र गुन्ह्यातून, भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम २७१(१) नूसार निर्दोष मुक्त करण्यात येते.

<u>२.</u> आरोपींनी पुर्वी दिलेले बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येते.

**<u>३.</u>** आरोपींनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता ४८१ अन्वये रुपये १५,०००/– चा वैयक्तीक जामिन व त्याच रक्कमेचा जामिनदार द्यावा.

**<u>४.</u>** या खटल्यात जप्त असलेला टिप्पर क्रमांक एम.एच.३५–ए.जे.३१०६ हा सुप्रतनाम्यावर परत करण्यात आला असल्यास, सुप्रतनामा बंधपत्र रद्द करण्यात यावा. तसेच, वर नमुद टिप्पर जप्त असल्यास वाहनाच्या नोंदणीकृत मालकास वर नमुद टिप्परचे कागदपत्रांची पडताळणी केल्यावर अपील कालावधीनंतर परत करण्यात यावे.

**<u>५.</u>** खटल्यात जप्त सात ब्रास रेती तालुका दंडाधिकारी, भिवापूर यांच्याकडे सुपूर्द करुन, त्यांनी नियमानुसार विल्हेवाट करुन प्राप्त रक्कम शासनास जमा करावी.

न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.

LAD SURAJ JANARDAN
Digitally signed by LAD SURAJ JANARDAN
Date: 2026.05.07 15:50:03 +0530

भिवापूर.
दिनांक – ०७.०५.२०२६.

(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.

<u>CERTIFICATE</u>

I affirm that the contents of this P.D.F. File of judgment/order are word to word as per original judgment/order.

Name of Stenographer : Ku. K. S. Kathane
to C.J.J.D. & J.M.F.C., Bhiwapur.